MHNG130011892022

खटला दाखल तारीख : ०६/१०/२०२२.
खटला नोंदणी तारीख : ०६/१०/२०२२.
निकालाची तारीख : २९/०४/२०२४.
कालावधी : ०१ वर्ष ०६ महिने २३ दिवस

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७०७/२०२२** **निशाणी क्र. १२ खाली**

**सरकार वि. मंगल जयदेव उईके**

**न्या य नि र्ण य**

(आज दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजी पारीत)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दंडनीय अपराधाकरीता खटला चालविण्यात आलेला आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :-

२) दिनांक २७/०८/२०२२ रोजी पोलीस पाटीस रविंद्र रामटेके यांच्याकडुन फोनद्वारे मिळालेल्या माहितीवरुन पो.शि. राकेश रामकृष्णा राऊत, पो.हवा. ओमप्रकाश कोडवते, पो.शि. लक्ष्मीकांत मुदनर हे स्टाफ, पंच व पोलीस पाटील यांच्यासह मौजा हसापुर टोली येथील सुनिल कुंभरे याच्या घराकडे गेले असता त्याच्या घरामागे एक इसम दिसुन आला. पोलिसांना पाहुन तो इसम पळुन गेला. पळुन गेलेला इसम हा मंगल जयदेव उईके हा असल्याचे महिला पंच व पोलीस पाटील यांनी सांगितले. पोलिसांनी सदर इसम पळुन गेलेल्या ठिकाणची व आजुबाजुच्या परिसराची पाहणी केली असता एका प्लास्टीक बोरीत २५ बिस्लेरी बॉटलमध्ये द्रवपदार्थ भरलेले मिळुन आले. मिळुन आलेल्या बिस्लेरी बॉटलचे झाकण उघडुन पंचाना वास दिला असता पंचांनी उग्र व आंबट मोहाफुल गावठी दारुचा वास येत असल्याचे सांगितल्याने पो.हवा. ओमप्रकाश कोडवते यांनी खात्री करुन घटनास्थळावरुन २५ बिस्लेरी बॉटलमधील एकुण २५ लीटर मोहाफुल गावठी दारु एकुण किंमत रु.२,५००/- चा मुद्देमाल जप्ती पंचनाम्याप्रमाणे पंचासमक्ष जप्त केला. त्यापैकी एका काचेच्या स्वच्छ शिशीत १८० मि.ली. मोहाफुल गावठी दारु रासायनिक परिक्षणाकरीता वेगळी काढुन

त्यावर पंच व पो.हवा. ओमप्रकाश कोडवते यांच्या सहीचे कागदी लेबल लावुन मोक्यावर सीलबंद केले. उर्वरीत मुद्देमाल मोक्यावर पंचासमक्ष नाश केला. म्हणुन पो.शि. राकेश रामकृष्णा राऊत यांनी आरोपीच्याविरुद्ध रामटेक पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दिली आहे.

३) सदर लेखी तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे गुन्हा क्र. ५०१/२०२२ नोंदविण्यात आला आहे. पोलीस हवालदार ओमप्रकाश कोडवते यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपीच्याविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४) अभिलेखावरील तथ्यांच्या आधारे मी आरोपीविरुध्द गुन्ह्याचा तपशील निशाणी क्र. १२ वर नोंदविला. सदरचा तपशील आरोपीला वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा शाबित करण्यासाठी दोन साक्षीदार तपासण्यात आले. इतर साक्षीदारांना समन्सची बजावणी होऊन देखील ते हजर झाले नाही.

५) आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे स्पष्टीकरण निशाणी क्र. १५ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपीने त्याच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

६) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित झाले आहेत. त्या प्रत्येक मुद्दयांवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २७/०८/२०२२ रोजी १२.३० ते १.०० वाजण्याच्या सुमारास मौजा हसापुर टोली, ता. रामटेक, जि. नागपूर येथे आरोपीच्या ताब्यातून २५ बिस्लेरी बॉटलमध्ये प्रत्येकी १ लीटरप्रमाणे २५ लीटर मोहाफुल गावठी दारु | |

| अ.क्र. | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | एकूण किंमत रु.२,५००/– चा मुद्देमाल मिळून आला. त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे दंडनीय अपराध केला आहे ? | ..... नाही. |
| २) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: का र ण मि मां सा ::

७) अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द खटला शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र. १ चंद्रकला विलास कुंभरे व साक्षीदार क्र. २ बेबीबाई यशवंत भुरे (घटनास्थळ जप्ती पंच) यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. आरोपीतर्फे कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. विद्वान सहाय्यक अभियोक्ता व आरोपीचे विद्वान वकिलांनी प्रकरणात युक्तीवाद केला आहे.

**मुद्दा क्र. १ करीता** :–

८) पंच चंद्रकला विलास कुंभरे (अ.सा.क्र.१) व बेबीबाई यशवंत भुरे (अ.सा.क्र.२) हे सदर खटल्यात घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. चंद्रकला विलास कुंभरे (अ.सा.क्र.१) हिने तिच्या साक्षीत शपथेवर न्यायालयाच्या पुढे असे सांगितले की, आरोपी मंगल उईके हसापुर येथे राहत असल्याने साक्षीदार त्याला ओळखते. दिनांक २७/०८/२०२२ रोजी साक्षीदार तिच्या घरी असताना तिला त्यांच्या गावातील महिला मंडळाच्या बाया आरोपी हा दारु विकत आहे, अशा सांगत आल्या. त्यानंतर ती त्या बायांसोबत त्यांच्या घराकडे गेली. तेथे पोलीस आले होते. आरोपी हा त्यांना बघुन पळून गेला. त्याठिकाणी २५ बिस्लेरी बॉटलमध्ये २५ लीटर मोहाफुल दारु होती. पोलिसांनी सदरचा मुद्देमाल त्यांच्यासमक्ष जप्त केला. साक्षीदाराला निशाणी क्र. १३ वरील घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखवला असता त्यावर तिची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याने ती सांगत आहे. तसेच साक्षीदार क्र. २ बेबीबाई यशवंत भुरे (अ.सा.क्र.२) हिने

तिच्या साक्षीत शपथेवर न्यायालयाच्या पुढे असे सांगितले की, दिनांक २७/०८/२०२२ रोजी पोलिसांनी तिला आरोपीच्या घराजवळ बोलावले होते. बायांनी दारु पकडली असे म्हणत होते. किती दारु पकडली होती, याबाबत तिला काही माहिती नाही. तिच्यासमक्ष पोलिसांनी आरोपी मंगल याला पकडुन नेले होते. पोलिसांनी त्याठिकाणी काय केले होते, हे तिला माहीत नसल्याचे ती सांगत आहे. तिला निशाणी क्र. १४ वरील सुचनापत्र व निशाणी क्र. १३ वरील घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवला असता त्यावर तिच्या सह्या असुन त्यातील मजकुराविषयी तिला माहीत नसल्याचे ती सांगत आहे.

९) प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने तपासी अधिकारी यांना तपासलेले नाही. अभियोग पक्षाने घटनास्थळ जप्ती पंचनाम्यातील मजकूर न्यायालयाच्या पुढे सिद्ध केलेला असला तरी लेखी रिपोर्ट व प्रथम खबर अहवालातील मजकूर न्यायालयाच्या पुढे सिद्ध केलेला नाही. तपासी अधिकारी व स्वतंत्र साक्षीदारांना वारंवार समन्स काढून देखील त्यांना हजर करुन त्यांची साक्ष नोंदविण्यास अपयश आलेले आहे. अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे होते की, आरोपीच्या ताब्यातून एकूण २५ लीटर मोहाफुल गावठी दारु एकूण किंमत रु.२,५००/- चा मुद्देमाल अवैधरित्या मिळून आला. अभियोग पक्षाने जप्त मुद्देमालापैकी काढलेले नमुने रासायनिक विश्लेषकाकडे घेऊन जाणा-यास तपासले नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल केलेला असला तरी त्याला साक्षीदारांतर्फे सिध्द केलेला नाही. म्हणून सदरचा मुद्देमाल मोहाफुल गावठी दारु होती किंवा नाही, याबाबत शंका निर्माण होते. अभियोग पक्षास इतर साक्षीदारांना तपासण्यात अपयश आले आहे. त्यामुळे आरोपीने वरीलप्रमाणे मोहाफुल गावठी दारु स्वतःजवळ अनधिकृतरित्या बाळगली, हे सिध्द करु शकले नाही. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवलेले प्रतिकथन हे संशयापलीकडे जाऊन सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविणे न्यायाचे दृष्टीने उचित होणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता** :-

१०) अभिलेखावरील पुरावा आरोपीस गुन्ह्यात दोषी धरण्याइतपत स्पष्ट, सबळ व

पुरेसा नाही. त्यामुळे फौजदारी प्रणालीनुसार आरोपीविरुध्द दोषारोप संशयापलीकडे अभियोग पक्षाने शाबित केलेला नाही. म्हणून मी मुद्दा क्र. २ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**-: आ दे श :-**

(१) आरोपी **मंगल जयदेव उईके** याला महाराष्ट्र दारुबंदी कायदा, कलम ६५(ई) या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

(३) जप्त मोहाफुल गावठी दारु मोक्याच्या जागेवर नष्ट केलेली असल्याने त्याबाबत वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही.

(४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७-अ अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

HARIDAS SANDIPAN SATPUTE

S.C.C. No. 707-2022
Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Location: Ramtek
Date: 2024.04.30 11:47:29 +0530

रामटेक. (एच.एस.सातपुते)

दिनांक : २९/०४/२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

रामटेक.

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 29/04/2024. |
| Judgment dictated on | : | 29/04/2024. |
| Transcription ready on | : | 29/04/2024. |
| Judgment checked and signed on | : | 29/04/2024. |

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original judgment.

P.A. Mehatre
Stenographer (Gr.III)